# एकतत्त्व नाम

**बापट गुरुजीं**

नामस्मरण हा ईश्वर प्राप्तीचा सगळ्यात सोपा आणि सुलभ मार्ग आहे असं हिंदुस्थानातल्या अनेक संतांनी वारंवार सांगितलं आहे. म्हणूनच 'नामा'निराळे राहू नका असं गोंदवलेकर महाराजांसारख्या सत्पुरुषाने सांगितलेलं आढळतं. नाम म्हणजे नेमकं काय, याचा साकल्याने विचार केला तर लक्षात येतं की रूप, गंध, स्पर्श, नाद किंवा रसाद्वारे मनुष्याला जाणवलेल्या कुठल्याही पदार्थाकरिता ज्या शब्दांचं प्रयोजन केलं जातं, त्यालाच त्या पदार्थाचं 'नाव' असं म्हटलं जातं आणि हे नाव जेव्हा ईश्वरी तत्त्वाविषयी असतं, तेव्हा त्यालाच 'नाम' असं संबोधन प्राप्त होतं. हे नाव, त्या पदार्थाचा पुनर्प्रत्यय देणारं असतं. समजा एखाद्याने प्रथमच आंबा हे फळ खाल्लं तर त्यावेळी त्याचा मेंदू त्या फळाच्या रंगाची, चवीची, स्वादाची नोंद घेतो आणि त्यानंतर भविष्यकाळात त्याच्यासमोर 'आंबा' या शब्दाचं केवळ उच्चारण जरी झालं तरी रूप, रंग, गंधाने युक्त अशी आंब्याची प्रतिमा प्रत्यक्ष आंबा न खाताही मेंदूमध्ये उजळून निघते. मग त्या अनुभवाचा पुनर्प्रत्यय घेणारं त्याचं मन हे देहावरही परिणाम घडवून आणतं व कदाचित त्याच्या तोंडाला पाणीही सुटतं! 'चिंच' या शब्दाच्या नुसत्या उच्चारणाबरोबर आंबट चव अनुभवणारेही पुष्कळ जण असतील. याचप्रमाणे कोणतंही नाम हे कोणत्यातरी ईश्वरी प्रतीकाच्या आकार, रूप, नाद आदी अनुभवांच्या खजिन्याची किल्ली असतं आणि नामस्मरण करून भक्ताने त्या अनुभूतीच्या खजिन्यात प्रवेश करणं अपेक्षित असतं!

नामांतील हे एकत्व लक्षात येण्यासाठी अध्यात्मात काही दृष्टांत दिले आहेत. 'मातीचा घट' म्हटल्यावर डोळ्यांसमोर एक विशिष्ट आकार निर्माण होतो. तो आकार काढून टाकला तर काय शिल्लक राहील? फक्त माती! त्याचप्रमाणे सदरा हा शब्द उच्चारताक्षणी डोळ्यासमोर एखादा छानपैकी सदरा उभा राहील. या सदऱ्याचाही विशिष्ट आकार जर मनः- पटलावरून पुसून टाकला तर काय शिल्लक राहील? कापड! म्हणजेच आकार, रूप बदललं की नावही बदललं! याचप्रकारे जर त्या सदऱ्याच्या मूळ तत्त्वापर्यंत अधिकाधिक जात राहिलो तर उरेल फक्त पांढराशुभ्र कापूस! मुळात हा कापूस कशातून निर्माण झाला या प्रश्नाला उत्तर येईल माती! म्हणजेच माती या एकाच मूळ तत्त्वापासून कापूस निर्माण झाला आणि घटही. अर्थात म्हणून कोणी वस्त्राऐवजी माती धारण करू लागला तर त्याला हे जग वेड्यात काढेल, कारण हा भेद व्यवहारापुरता ग्राह्य धरावा लागतो! याचाच अर्थ असा की, मूळ अधिष्ठान एकच असलं तरी त्यामध्ये उपयोगित्व, आकार, रंग इत्यादींनुसार फरक पडतो. याप्रमाणेच एकतत्त्व नामातही शक्तीच्या वैविध्यतेचा आभास निर्माण होतो. या आभासमय वैविध्यतेमुळे मानवी मनाच्या हस्तक्षेपानुसार काही जणांना 'श्रीदत्त जय दत्त' हे नाम प्रिय वाटेल तर काहींमध्ये 'नमो गुरवे वासुदेवाय' हे नाम उत्कट भक्तिभावना जागृत करेल.

निरनिराळ्या नामांमध्ये एकच ईश्वरी तत्त्व असलं तरी एखाद्या नामाचं फळ लवकर मिळताना दिसतं, तर एखाद्या नामाचं उशिरा. वस्तुतः हा फरक नामामुळे पडत नसून तो भक्ताच्या वृत्तींमुळे पडतो. जसं, भुकेने अतिशय व्याकूळ झालेल्याला इतर काही सुचत नाही, त्याच्या इतर इंद्रियांनी जणू आपापला व्यापार बंद केलेला असतो, अशावेळी अन्नग्रहणानंतर क्षुधा शांतीचं आणि तृप्तीचं फळ त्याला तत्काळ मिळतं. तसंच अतिशय व्याकूळतेने जेव्हा ईश्वराचं नाम घेतलं जातं आणि त्याला जेव्हा ईश्वराच्या सर्व रूप-गुणांवर झालेल्या एकाग्र ध्यानाची जोड मिळते, तेव्हा नामस्मरणाच्या अवर्णनीय आनंदाचं फळ तत्काळ मिळाल्यावाचून राहत नाही. नाम घेतानाही जर आपण आपला 'मी'पणा हातचा राखून, संसाराच्या चिंतांना सोबतीला घेऊन नाम घेत राहिलो तर अशावेळी स्मरण नामाचं होत नसतं, तर ते अशाश्वत अस्तित्वाने ग्रस्त असलेल्या आपल्याच वैयक्तिक नावाचं होत असतं. संतश्रेष्ठ तुकाराम महाराज म्हणतात त्याप्रमाणे अणूहून लहान होता आलं तरच आकाशाहूनही विशाल असणाऱ्या ईश्वरी तत्त्वाशी एकरूप होता येतं. अणूएवढं होण्यासाठी स्वतःकडे क्षुल्लकत्व घेऊन 'माझा मी न राहिलो' अशी संपूर्ण शरणागत वृत्ती निर्माण व्हावी लागते. नामस्मरणाच्या फलप्राप्तीसह सर्व विवंचना ईश्वरावर सोडून जो मनुष्य अत्यंत तन्मयतेने, पूर्ण शरणागतीसह आपले आवडते नाम घेईल आणि नामाच्या प्रत्येक आवर्तनाबरोबर जर त्या ईश्वरी प्रतीकाचं स्वरूप आठवेल, तर तो मनुष्य, त्या नामधारी तरीही नामानिराळ्या असणाऱ्या ईश्वरी शक्तीशी संपूर्ण तादात्म्य पावेल, अगदी तत्काळ! ■